## ३ रोजी लोकशाही दिन

**जळगाव ।** दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, दिनांक ३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता अल्पबचत सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. तालुका लोकशाही दिनांक अर्ज केलेला असेल आणि अर्जासंबंधी एका महिन्याच्या आत तालुकास्तरावरुन कोणतेही उत्तर मिळालेले नसेल अशाच वैयक्तिक हितसंबंधाबाबतच्या तक्रारी घेऊन ३ फेब्रुवारी रोजी लोकशाही दिनी उपस्थित राहावे.


देशदूत

# My जळगाव

। गुरुवार, दि. ३० जानेवारी २०२५ । पान ३ ।


## मृत्यूप्रकरणी गुन्हा दाखल

**जळगाव ।** नशिराबाद रोडवरील पाटील नर्सरी समोर भरधाव दुचाकी डिव्हायडरवर धडकल्याने दोन तरूणांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना २२ रोजी रात्री ८ वाजता घडली होती. तर एकजण गंभीर जखमी झाला होता. याप्रकरणी मंगळवारी दुपारी अडीच वाजता नशिराबाद पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजय रवींद्र अहिरे वय-२८ आणि सुमित विनोद करोसिया वय-१८ दोन्ही रा. पाचोरा जि.जळगाव असे मयतांचे नाव आहे.

# शिरसोलीत गोमांस विक्रीवरुन तणाव

## एकास पब्लिक मार; पोलिसांची मध्यस्थी

**जळगाव । प्रतिनिधी**

शिरसोली येथे गोमांस विकत असल्याच्या संशयावरून एका इसमास आठवडे बाजार येथे जमावाकडुन जबर मारहाण करण्यात आली. वेळीच औद्योगिक पोलीसांनी हस्तक्षेप करीत सदर इसमास ताब्यात घेतल्याने पुढील अनर्थ टळला. यावेळी मोठी गर्दी जमा झाली होती.

शिरसोली प्रन येथील एका ठिकाणी गोमांस कापले जात असुन तेथे त्याची विक्री होत असल्याचे गावातील काही तरुणांना कळले. त्यावरुन सर्व तरुण एकत्र येत गोमांस विक्री करीत असलेल्या इसमास त्या ठिकाणाहुन मुद्देमालासह पकडुन शिरसोली प्र बो येथील बाजारपेठ भागात आणले. गोमांस विक्री करणाऱ्याला पकडले असल्याची वार्ता गांवात पसरताच बाजार पेठेत एकच गर्दी जमा झाली. गर्दीतील काही तरुणांनी गोमांस विक्री करणाऱ्या इसमास चांगलाच चोप दिला. यावेळी रामभाऊ भिल, अर्जुन पवार, अनिल न्हावी, प्रविण पाटील, प्रदीप पाटील यांनी जमावाला शांत करण्याचा प्रयत्न करुन औद्योगिक पोलीसांना माहीती कळवुन पाचारण करण्यात आले.

**पोलिसांची घटनास्थळी धाव**

घटनेची माहिती मिळताच औद्योगिक पोलीस स्टेशनचे एपीआय अनिल वाघ, पीएसआय राहुल तायडे, हेड कॉन्स्टेबल समाधान टाहकळे, शुध्दधन ढवळे, अधिकार पाटील, योगेश बारी,कीरण पाटील, यांच्यासह मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करत संशयीत इसमाची गर्दीतुन सुटका करण्यात आली. तसेच त्यास चौकशीसाठी ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला रवाना करण्यात आले. या वेळी काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.



## जळगावात ५५ वर्षीय इसमाची आत्महत्या

### शनिपेठ पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद

**जळगाव । प्रतिनिधी**

पत्नी आणि मुलगा कामावर गेलेले असतांना घरी कोणीच नसतांना विलास रुपचंद इंगळे (वय ५५, रा. वाल्मिक नगर) यांनी राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केली. ही घटना बुधवारी दुपारी पाच वाजेच्या सुमारास उघडकीस आली. आत्महत्येचे कारण अस्पष्ट असून याप्रकरणी शनिपेठ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

शहरातील वाल्मिक नगरात राहणारे विलास इंगळे हे सेंट्रींग काम करुन कुटुंबाचा उदनिर्वाह करीत होते. बुधवारी नेहमीप्रमाणे त्यांची पत्नी या स्वयंपाकाच्या कामाला गेल्या होत्या, तर मुलगा रिक्षामध्ये प्रवाशांना सोडण्यासाठी गेला होता. त्यामुळे इंगळे हे घरी एकटेच होते. दुपारी पाच वाजेच्या सुमारास विलास इंगळे यांनी घराचा दरवाजा आतुन बंद करुन दोरीच्या सहाय्याने गळफास घेत आपली जीवनयात्रा संपविली. ही घटना त्यांच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांच्या लक्षात येताच, त्यांनी तात्काळ इंगळे यांच्या मुलाला माहिती दिली. इंगळे यांचा मुलाने तात्काळ घराकडे धाव घेतली, घराचा दरवाजा उघडला असता, त्याला वडील गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आले. वडीलांचा मृतदेह बघताच त्याने एकच आक्रोश केला. त्यानंतर परिसरातील नागरिकांच्या मदतीने मृतदेह खाली उतरवून तो शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात दाखल केला. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करीत मयत घोषीत केले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा व तीन मुली असा परिवार आहे.

## थोडक्यात...

### आजपासून ग्रामसंवाद सायकल यात्रा

**जळगाव ।** येथील गांधी रिसर्च फाऊंडेशनच्यावतीने महात्मा गांधीजींच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने (हुतात्मा दिनी) दरवर्षीप्रमाणे ग्राम संवाद सायकल यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. गांधी विचारांचा प्रचार-प्रसाराच्या उद्देशाने दि. ३० जानेवारी ते १० फेब्रुवारी दरम्यान निघणाऱ्या १२ दिवसीय सायकल यात्रेस जळगाव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद हिरवी झेंडी दाखविणार असून जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., चे अध्यक्ष व गांधी रिसर्च फाऊंडेशनचे संचालक अशोकभाऊ जैन यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. ग्राम संवाद सायकल यात्रा यावर्षी जळगाव जिल्ह्याच्या उत्तर भागातील जळगाव, यावल, चोपडा तालुक्यातून जवळपास ५० गावांना भेटी देणार असून सुमारे ३०० किमीचा प्रवास करणार आहे. या यात्रेच्या माध्यमातून एक लाख विद्यार्थी, युवक, महिला व नागरिकांशी संवाद साधण्यात येणार आहे. या सायकल यात्रेत फ्रांस, नेपाळ देशांसह भारतातील विविध राज्यातील व स्थानिक अशा ४० स्वयंसेवकांचा सहभाग आहे. यात्रेदरम्यान विविध शाळा महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांसाठी सापशिडी, मूल्य संवर्धनाचे खेळ, प्रश्नमंजुषा, कठपुतली खेळ या माध्यमातून चारित्र्य निर्माणाचे कार्य करणार आहे. तसेच ६ वेगवेगळया ठिकाणी महिलांसाठी विशेष कार्यक्रमाचे तर नागरिकांसाठी दररोज पथनाट्याद्वारे प्रबोधन कार्यक्रम करण्यात येणार आहे. यात्रेत दररोज दोन कार्यक्रम शाळा, महाविद्यालयात तर रात्री मुक्कामाच्या ठिकाणी जाहीर कार्यक्रम होणार आहे. भारतीय स्वातंत्र्यावरील प्रदर्शनी कार्यक्रमांच्या ठिकाणी लावण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमांची सांगता भारताच्या प्रतिज्ञेने होणार आहे. विद्यार्थी व नागरिकांनी सहभाग देऊन सहकार्य करावे असे आवाहन आयोजकांच्यावतीने करण्यात आले आहे.

### अनिल बडगुजर यांच्या आत्महत्येप्रकरणी चौकशी

**जळगाव ।** अनिल बडगुजर यांच्या आत्महत्येप्रकरणी तालुका पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. बडगुजर यांनी सुसाईट नोटमध्ये उल्लेख केलेल्यांपैकी हरेश्वर भोई, शरद पाटील, संदीप खेडकर यांना तालुका पोलिसांनी मंगळवारी चौकशीसाठी बोलविले होते. या प्रकरणात कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे चौकशी करण्यात येईल व काही तथ्य आढळल्यास कारवाई केली जाईल, अशी माहिती पोलिस निरीक्षक संजय गायकवाड यांनी दिली.

### माहिती अधिकारी युवराज पाटील यांचे व्याख्यान



**जळगाव ।** मराठी भाषा संवर्धन सप्ताहानिमित्त सामाजिक न्याय विभाग आणि जिल्हा माहिती कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृहात मराठी भाषा: उगम आणि भाषा संवर्धन या विषयावर जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांचे व्याख्यान संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक न्याय विभागाचे कार्यालय अधिक्षक राजेंद्र कांबळे होते. विद्यार्थ्यांसह अधीक्षक, कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. युवराज पाटील यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले की, मराठी भाषेचा उगम महाराष्ट्री प्राकृत भाषेतून झाला. भारतभर प्रचलित असलेल्या प्राकृत भाषांची लिपी ब्राम्ही होती. पुढे या लिपीचा विकास होत जाऊन देवनागरी लिपीचा उपयोग वाढला. यावेळी त्यांनी गाथा सप्तशती या राजा हाल यांनी संपादित केलेल्या प्राचीन ग्रंथाचा उल्लेख करत, त्यातून मराठी भाषेच्या प्राचीनतेवर प्रकाश टाकला. तसेच विवेकसिंधू, ज्ञानेश्वरी, लीळाचरित्र यांसारख्या ग्रंथांचे दाखले देऊन मराठी भाषा समृद्ध कशी झाली, याचे विवेचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सामाजिक न्याय विभागाचे अधीक्षक राजेंद्र कांबळे यांनी केले. यावेळी अरुण वाणी, वैशाली पाटील, बाळू बोरसे उपस्थित होते. आभार प्रदर्शन वैशाली पाटील यांनी मानले. यशस्वीतेसाठी वैशाली पाटील, एस आर पाटील, बाळु बोरसे, दीपक सोनवणे यांनी परिश्रम घेतले

### थंडी गायब, जळगावात तापमानाचा पारा वाढला

**जळगाव ।** जळगावातील तापमानात चढ-उतार दिसून येत असून रात्रीच्या वेळेस आणि पहाटेच्या दरम्यान थंडी जाणवते, तर दिवसा उकाडा जाणवत आहे. जळगावात बुधवारी ११ अंशावर असलेलं किमान तापमान वाढून १५ अंशावर पोहोचले. यातच हवामान खात्याने तीन दिवस हवामान कोरडे राहणार असून दुपारनंतर ठराविक ठिकाणी अंशतः ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता वर्तविली आहे. दरम्यान जळगावात आज कमाल तापमान ३४ अंश सेल्सिअस तर किमान तापमान १५ ते १६ अंश सेल्सिअस इतके असण्याची शक्यता आहे.

## दुचाकीस्वार जखमीप्रकरणी बसचालकावर गुन्हा दाखल

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव शहरातील स्वातंत्र्य चौकात भरधाव बसने दुचाकीला मागुन जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार तरूण गंभीर जखमी झाल्याची घटना १२ जानेवारी रोजी दुपारी अडीच वाजता घडली होती. याप्रकरणी मंगळवारी २८ जानेवारी रोजी रात्री १० वाजता जिल्हापेठ पोलीस ठाण्यात बसवरील चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, अभिमन्यू लक्ष्मण शिनकर (वय ३८, रा. अरिहंत कॉलनी) हे आपल्या परिवारासह वास्तव्याला आहेत. ते सेवानिवृत्त भारतीय सैनिक आहेत. १२ जानेवारी रोजी त्यांच्याजवळील (यूके ०७, डीएफ ५४५१) क्रमांकाच्या दुचाकीने स्वातंत्र्य चौकातून जात होते. यावेळी मागून भरधाव वेगाने जाणाऱ्या (एमएच १४, बीटी १९७९) क्रमांकाच्या बसने त्यांना मागून जोरदार धडक दिली. यामध्ये अभिमन्यू शिनकर हे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार झाल्यानंतर चंद्रकांत शिनकर यांनी जिल्हापेठ पोलिसात तक्रार दिली. त्यानुसार मंगळवारी २८ जानेवारी रोजी रात्री १० वाजता जिल्हापेठ पोलीस ठाण्यात बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस नाईक कमलेश पवार करीत आहे

## गंभीर आजाराचे कारण सांगत एक लाखात फसवणूक

**जळगाव । प्रतिनिधी**

गंभीर आजार असल्याचे सांगून उसनवारीने घेतलेले पैसे १ लाख रूपये परत न करता सम्राट कॉलनीत राहणाऱ्या एका ४४ वर्षीय व्यक्तीची फसवणूक केली. तसेच पैसे परत मागितल्यानंतर जीवेठार मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार उघडकीला आला आहे. याप्रकरणी मंगळवारी २८ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता एमआयडीसी पोलीस ठाण्यात फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक माहिती अशी की, जळगाव शहरातील सम्राट कॉलनी येथे अनिल अर्जून महाले वय ४४ हे आपल्या परिवारासह वास्तव्याला आहेत. ईलेक्ट्रॉनीक दुकान चालवून ते आपला उदरनिर्वाह करतात. १८ ऑक्टोबर २०२१ रोजी त्यांच्या ओळखीतला धनराज आत्माराम पवार वय ३३ रा. ज्ञानदेव नगर, जळगाव याने गंभीर आजार असल्याचे सांगून अनिल महाले यांच्याकडून १ लाख रूपये उसनवारीने घेतले. पैसे घेतल्याचे १०० रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहून दिले होते. त्यानंतर अनिल महाले यांनी वेळोवेळी पैसे मागितले असता त्यांना धनराज पवार योन जीवेठार मारण्याची धमकी देवून फसवणूक केली. हा प्रकार घडल्यानंतर अनिल महाले यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार मंगळवारी २८ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता संशति आरोपी धनराज पवार यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र उगले हे करीत आहे.

## गांजाचा नशा करणाऱ्या तरुणावर कारवाई

**जळगाव । प्रतिनिधी**

शहरातील छत्रपती शिवाजी नगर रेल्वे उड्डाण पुलाजवळ गांजा घेवून नशा करणाऱ्या तरूणावर मंगळवारी २८ जानेवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता जळगाव शहर पोलीसांनी कारवाई केली आहे. याप्रकरणी रात्री ८ वाजता जळगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा एनडीपीए कायद्यांर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल भवारी यांना मिळालेल्या गोपनिय माहितीनुसार शहरातील छत्रपती शिवाजी नगर रेल्वे उड्डाणपुलाजवळ असलेल्या मोकळ्या जागेत एक जण गांजाचा नशा करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्यांनी पथकाला कारवाई करण्याच्या सुचना दिल्या. पथकाने मंगळवारी २८ जानेवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता कारवाई केली. त्यावेळी त्यांनी संशयित आरोपी मनोहर प्रकाश भोसले वय ३२ रा. गेंदालाल मिल परिसर, जळगाव याला ताब्यात घेतले.

त्यांच्या कडून गांजा पिण्याचे साहित्य जप्त केले. याप्रकरणी पोहेकॉ हरीलाल लक्ष्मण पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहेकॉ सतिष पाटील हे करीत आहे.

## गुलियन बॅरी सिंड्रोमबाबत उद्या प्रशिक्षण कार्यशाळा

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण द्वारा गुलियन बॅरी सिंड्रोमची सद्यस्थिती व पुर्वतयारी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा ३१ जानेवारी रोजी नियोजन भवन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव पार पडणार आहे.

या कार्यशाळेत जीबीएसचा परिचय आणि साथीचे रोग या विषयावर डॉ. पराजी बाचेवार, प्राध्यापक, जनरल मेडिसिन, जीएमसी, जळगाव मार्गदर्शन करतील. जीबीएसचे इटिओपॅथोजेनेसिस, क्लिनिकल वैशिष्ट्ये आणि प्रकार या विषयावर डॉ. गोपाळ घोलप, न्यूरोलॉजिस्ट, जीएमसी, जळगाव हे तर बालरोग लोकसंख्येमध्ये जीबीएसचे क्लिनिकल सादरीकरणे यावर डॉ. कौस्तुभ चौधरी मार्गदर्शन करणार आहेत.जीबीएसचे निदान, विभेदक निदान, मूल्यांकन आणि उपचार यावर डॉ अभिजित पिल्लई मार्गदर्शन करणार आहेत. जीबीएससाठी उच्च दर्जाचे उपचार या विषयावर डॉ. अमित भंगाळे, व जीबीएसच्या गुंतागुंत यावर डॉ. सायली पाटील, प्रतिबंधात्मक धोरणे यावर डॉ. व्ही. व्ही. पुजारी, प्राध्यापक, श्वसन चिकित्सा, जीएमसी, जळगाव या कार्यशाळेत मार्गदर्शन करणार आहेत.

## संगीतमय कार्यक्रमातून महात्मा गांधीजींच्या जीवनावर प्रकाश!

### गांधी रिसर्च व परिवर्तन आयोजित बंदे में है दम मैफिलीतून अभिवादन

**जळगाव । प्रतिनिधी**




महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीच्या पूर्व संध्येला गांधी रिसर्च फाऊंडेशन आयोजित व परिवर्तन जळगाव निर्मित बंदे में हे दम हा संगीतमय कार्यक्रम महात्मा गांधी उद्यान येथे करण्यात आले. महात्मा गांधी अनेक समज गैरसमज, अनेक माहीत नसलेल्या गोष्टी उलगडून सांगणारी, महात्मा गांधीजींचा शोध घेणाऱ्या संगीतमय कार्यक्रमातून महात्मा गांधीजींना अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, समाजकल्याण विभागाचे सहाय्यक उपायुक्त योगेश पाटील, जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील, डॉ. प्रदिप जोशी, अनिष शहा, स्वरुप लुंकड, अनिल कांकरिया, डॉ. अश्विनी देशमुख, डॉ. राधेश्याम चौधरी, सर्व सेवा समितीचे रत्नाकर पांडे, अँड. जमिल देशपांडे यांची उपस्थिती होती. मान्यवरांचे शब्दगंध दिवाळी अंक देऊन सन्मानित केले गेले. नाशिक विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे कार्यक्रमाच्या मध्यांतरात उपस्थित होते. वंदे मातरमने सुरवात झाली. सत्य अहिंसेची शिकवण देणारे..मानवतेचा प्रकाश दिसतो, सत्याग्रही नव नगर निघाले हि कविता सादर केले. भेटी लागे जीवा.. सावळे सुंदर रूप मनोहर..विठ्ठल नामाचा रे टाहो.. या रचना वरूण नेवे यांनी सादर केले. शंभू पाटील यांनी निवेदन केले. या कार्यक्रमाची संकल्पना जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांची होती. दिग्दर्शक नारायण बाविस्कर तर संगीत दिग्दर्शक मंजूषा भिडे, वेशभूषा प्रतिक्षा कल्पराज, रंगभूषा लिलिमा जैन आणि बिना मल्हारा यांची होती.

निर्मिती प्रमूख विनोद पाटील व वसंत गायकवाड यांची असून हर्षल पाटील सूत्रधार होते. यात गोविंद मोकासी, श्रद्धा कुलकर्णी, सुदिप्ता सरकार, अंजली धुमाड, वरूण नेवे, योगेश पाटील, राहूल कासार, अक्षय दुसाने, रोहित बोरसे, मानसी आसोदेकर, जयश्री पाटील, वंदना नेमाडे, पियूषा नेवे हे कलावंत होते. गांधी रिसर्च फाऊंडेशन च्या महिला सहकारी यांनी सुतकताई केली.

# जळगावात पंडित भीमसेन जोशी संगीत महोत्सव

**सांस्कृतिक**

## भैय्यासाहेब गंधे सभागृहात २ ते ४ फेब्रुवारीदरम्यान आयोजन

**जळगाव । प्रतिनिधी**



सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने येत्या ०२ ते ०४ फेब्रुवारी दरम्यान सायंकाळी ६ ते १० या वेळेत वाजता भैय्यासाहेब गंधे सभागृह, जिल्हा पेठ, जळगाव या ठिकाणी पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड आशिष शेलार यांची असून, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तथा अपर मुख्य सचिव ( सांस्कृतिक कार्य विभाग विकास) खारगे यांच्या मार्गदर्शनाखाली या महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या महोत्सवात २ फेब्रुवारी रोजी पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत शिष्यवृत्तीधारक गायक चैतन्य परब, ख्यातनाम गायिका अमृता काळे, विख्यात सारंगीवादक साबीर खान, ज्येष्ठ गायक पंडित हरीश तिवारी यांचे सादरीकरण होणार आहे तर ३ फेब्रुवारी रोजी पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत शिष्यवृत्तीधारक वादक ऋतुराज धुपकर व कृष्णा साळुंखे, प्रसिध्द गायक अनुरत्न रॉय, बासरीवादक चिंतन कट्टी व ज्येष्ठ गायक धनंजय जोशी यांचे सादरीकरण होणार आहे. मंगळवारी ४ फेब्रुवारी २०२५ रोजी पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत शिष्यवृत्तीधारक वादक जगन्मित्र लिंगाडे व यश खडके यांची जुगलबंदी, प्रसिध्द गायिका रौकिंणी गुप्ता यांचे गायन होणार आहे तर पद्मश्री पंडित रोणू मुजुमदार व ऋषिकेश मुजुमदार यांची बासरी जुगलबंदी व ज्येष्ठ गायक पंडित आनंद भाटे यांचे गायन असे नामवंत भारुड कार आपली शास्त्रीय संगीत गायन व वादन कला सादर करणार आहेत. या कार्यक्रमास स्वर्गीय वसंतराव चांदोरकर स्मृती प्रतिष्ठान यांनी सहकार्य केले आहे. रसिक प्रेक्षकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून या सुरेल कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

cmyk